**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APR 2023, VOL- 10/76*

# माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा अभ्यास

**सौ. शोभा संग्राम पाटील**
*सहाय्यक प्राध्यापिकाए आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा*

**Paper Received On:** 21 APRIL 2023
**Peer Reviewed On:** 30 APRIL 2023
**Published On:** 01 MAY 2023

***Abstract***

*जीवनामध्ये कोणतीही लहानात लहान किंवा मोठ्यात मोठी गोष्ट मिळवायची असेल तर आपल्याला श्रम करावे लागते. परिश्रमाशिवाय आपल्याला कोणतीही गोष्ट सहजरीत्या प्राप्त होत नाही त्यासाठी खूपच श्रम आणि कष्ट करावे लागतात. जो व्यक्ती नियमितपणे कष्ट करतो आणि श्रम करतो त्या व्यक्तीच्या जीवनात प्रगतीचे दार उघडले जाते. आपण आपल्या आयुष्यामध्ये यश मिळवण्यासाठी, ध्येय प्राप्त करण्यासाठी आणि स्वप्न पूर्ण करण्यासाठी जे कष्ट घेतो किंवा मेहनत करतो त्याला श्रम असे म्हणतात. त्यामुळे आपल्याला आपल्या जीवनामध्ये इतरांवर अवलंबून राहायचे नसेल तर आपल्याला श्रम करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. जर आपण आपल्या जीवनामध्ये श्रम केले नाही तर आपण जीवनामध्ये मिळणाऱ्या महत्त्वपूर्ण गोष्टीपासून वंचित राहू. श्रम केले नाही तर आपल्याला श्रमाचे महत्त्व कळणार नाही*

*शारीरिक श्रम घेताना आपल्या शरीराला खूप मेहनत करावी लागते. तसेच बौद्धिक श्रमामध्ये बुद्धीचा वापर अधिक करावा लागतो. आपल्याला चांगले व्यक्तिमत्व कमवायचे असेल तर आपल्याला खूप श्रम करावे लागते म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये श्रमाचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे .आणि श्रम हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. भावी पिढी सक्षम व्हावी असं वाटत असेल तर त्यांच्या बालमनावरती श्रमाचे संस्कार लहान वयापासूनच करायला हवेत.आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक आहे.आपल्या राष्ट्राचे उद्याचे नागरिक हे आळशी होऊ नयेत म्हणून मुलांच्या बालमनावरती चांगल्या संस्काराचे रोपण होणे आवश्यक आहे. त्यामध्ये श्रमाचे संस्कार ही काळाची गरज आहे*

*तात्पर्य विदयार्थ्यांमध्ये बालवयातच श्रमाची सवय निर्माण करणे आवश्यक आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

आधुनिक काळांत वैज्ञानिक शोधामुळे, संगणक व विविध आधुनिक साधन सुविधांमुळे शारीरिक श्रम व कष्ट करणे मुलांना कमीपणाचे वाटते. श्रम हे वेगवेगळ्या प्रकारचे असू शकते . काहींना शारीरिक कष्ट करावे लागते तर काहींना बौद्धिक कष्ट करावे लागते.'**प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे**' या उक्तीप्रमाणे प्रयत्न व जोडीला कष्ट केल्यामुळेच ध्येय साध्य होते. त्यासाठी अथक श्रम करण्याची प्रत्येकाची शारीरिक व मानसिक इच्छा व जिद्द असली पाहिजे. आपण जीवनामध्ये वेगवेगळ्या गोष्टीसाठी श्रम करत असतो. आपल्याकडे जे गुण आहेत कला आहेत आणि कौशल्य आहेत त्याच्या जोरावर आपण जीवनामध्ये यश प्राप्त करतो परंतु त्यासाठी आपल्याला जी मेहनत करावी लागते त्याला श्रम असे म्हणतात.श्रम म्हणजे कुठलं तरी ध्येय प्राप्त करण्यासाठी व्यक्ती जे शारीरिक, बौद्धिक कष्ट किंवा मेहनत घेते. त्यालाही श्रम असे म्हणतात. जर स्वत: श्रम केले तरच इतरांच्या श्रमाचे मूल्य विद्यार्थ्यांना कळेल व त्यातूनच विदयार्थ्यांमध्ये कष्टाची कामे करणाऱ्या श्रमिकांबद्दल आदर निर्माण होईल व त्यांच्याशी आदराने वागतील. इतरांना

मदतीचा हात देण्यास सदैव तयार होतील. दिवसरात्र कारखान्यात राबणारा मजूर समाजासाठी विविध वस्तूंचे उत्पादन करीत असतो. कापडगिरणीतील यंत्रे फिरलीच नाहीत तर वस्त्राची मूलभूत गरज कशी भागणार? कष्ट करणाऱ्या श्रमिकांच्या व्यथा आपण पुस्तकांत वाचतो. पण त्यांच्या श्रमाचे खरे मोल आपण जाणतो का?एक काळ असा होता की, जेव्हा समाजातील श्रमिकांना कमी लेखले जाई पण ती परिस्थिती आता बदलली आहे. कारण जगाने आज ओळखले आहे की, 'श्रमलक्ष्मी ही देवी उदयाची! ' आजचा नेता आजच्या युगाचा मंत्र सांगताना म्हणतो, "मज नकोत अश्रु घाम हवा!'' कारण या नेत्याने जाणले आहे 'जिथे राबती हात तेथे हरी!' साऱ्या कष्टकऱ्याच्या श्रमांचे मोल खरेच करायचे असेल तर त्याचा मार्ग एकच आणि तो म्हणजे त्यांचा 'श्रमाचा वसा' आपणही उचलायला हवा.आजच्या काळात शारीरिक कष्ट करूनच यश मिळते असे नाही तर मानसिकदृष्ट्या केलेले श्रम सुद्धा यश मिळविण्यासाठी महत्वाचे ठरते.लोकांना कंपन्यांमध्ये, कारखान्यांमध्ये काम करावे लागते तिथे त्यांना शारीरिक तसेच मानसिक श्रमही करावे लागते. तर माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांमध्ये या शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांच्या विषयी आदराची भावना निर्माण होणे आवश्यक आहे.श्रमाविषयी कमीपणाची भावना निर्माण न होता आदराची भावना  निर्माण होणे गरजेचे आहे. कारण परिश्रम केल्याने आपल्याला जीवनामध्ये विविध समस्यावर मात करण्याची सवय लागते. तसेच श्रम केल्याने आपल्याला प्रत्येक परिस्थितीला तोंड देता येते.

श्रमप्रतिष्ठा म्हणजे  ''कुठलेही शारीरिक कष्टाचे काम, हलके, कमी महत्त्वाचे ते हौसेने मनापासून करणे, असे काम करणाऱ्या श्रमिकांबद्दल आदर बाळगणे, त्यांचा मान राखणे व त्यांच्या कामात सहभागी होणे म्हणजे श्रमप्रतिष्ठा होय.'

**श्रमाचे प्रकार**

व्यक्ती जे श्रम करते त्याला वेगळ्या वेगळ्या प्रकारांमध्ये विभागलं जाऊ शकतं.

1)**शारीरिक श्रम** :–शारीरिक श्रम घेताना आपल्या शरीराला खूप मेहनत करावी लागते.

उदाहराणार्थ –बांधकाम करणारा माणूस जे विटा उचलणे, सिमेंट लावणे मिसळणे वगेरे काम करतो त्याला आपण शारीरिक श्रम म्हणू शकतो. ती व्यक्ती ह्या कार्यात बुद्धीचा पण वापर करते पण मुख्यतः ती व्यक्ती आपल्या शरीराला कष्ट देत असते.

2)**बौद्धिक श्रम** :–बौद्धिक श्रमामध्ये बुद्धीचा वापर अधिक करावा लागतो,

शिक्षक जे शिकवण्याचं किंवा विद्यार्थी जे शिकण्याचं काम करतात त्याला आपण बौद्धिक श्रम म्हणू शकतो कारण ते दोघेही आपल्या बुद्धीला कष्ट देत असतात. कसला तरी विचार करणे ह्याला पण आपण श्रम म्हणू शकतो कारण त्यात व्यक्तीची बौद्धिक क्षमता वापरली जात असते.

आज आपल्या देशामध्ये झालेले वैज्ञानिक आणि लावलेले शोध हे देखील श्रमाच्या जोरावरच आहेत. आपल्या देशाला विकसनशील देशांमध्ये परिवर्तन करण्याचे काम देखील देशांमधील असणारे वैज्ञानिक, शिक्षक, वकील, डॉक्टर्स यांसारख्या लोकांच्या माध्यमातून होत असते परंतु इथपर्यंत येण्यासाठी आपल्याला श्रमाची गरज भासते.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आवश्यकता व महत्त्व**

**आवश्यकता**

विदयार्थ्यांना शिक्षण मिळवण्यासाठी श्रम आवश्यक आहे. शिक्षण विदयार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी एक उत्तम कौशल्य संचयीत करण्यास मदत करते. त्यामुळे, श्रम त्यांच्या शिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

1) विदयार्थ्यांना शारीरिक कष्टाची कामे करण्यास प्रवृत्त करण्यासाठी.

2) काम कोणत्याही स्वरूपाचे– कमी दर्जाचे,हलक्या प्रतीचे असले तरी स्वखुशीने करण्यासाठी.

3) शारीरिक बौद्धिक काम करण्यास मनापासून तयार होण्यासाठी

4) कष्टदायक अतिपरिश्रमाची कामे करण्यास टाळाटाळ करणार नाहीत यासाठी

5) कामाचे स्वरूप कसेही असले तरी ती कामे अर्धवट न सोडता चांगले व व्यवस्थित वेळेत पूर्ण करतील यासाठी

6) श्रमाचे मूल्य समजण्यासाठी

7) श्रमाचे महत्त्व व मूल्य समजल्यामुळे श्रम करणाऱ्या श्रमिकांबद्दल आस्था, प्रेम,आपुलकी वाटण्यासाठी

8) श्रम करणाऱ्या लोकांमध्ये मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना सहाय्य करण्यास आनंदाने प्रवृत्त होण्यासाठी

**महत्त्व**

श्रम हे मानवी जीवनाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या देशाच्या विकासासाठी अधिकांश गोष्टी श्रमाशी संबंधित आहेत. श्रम करणे लोकांचे आत्मसंयम आणि आत्मविश्वास वाढविते. श्रमाच्या माध्यमातून लोकांना नैतिकता, जीवनकौशल्ये आणि त्यांच्या व्यक्तिमत्वात वाढ आणि विकास होते. श्रम करण्याची कला मानवी जीवनातील असंख्य मुद्द्यांसाठी उपयुक्त आहे, जसे कि आरोग्य, शिक्षण, आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि आत्मसंयम. श्रमाच्या माध्यमातून लोक आत्महत्या, नशेच्या, बेरोजगारी, अशिक्षितता आणि विविध सामाजिक बेचौनीच्या समस्यांपासून बाहेर पडतात. श्रमाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहेः

1. **शारीरिक विकास** : श्रम शारीरिक आरोग्यासाठी आवश्यक आहे. श्रमामुळे शारीरिक स्वास्थ्य आणि मानसिक स्वास्थ्य निरोगी राहते.नेहमी श्रमाचे काम करण्यामुळे संघर्षाच्या परिस्थितीत मानसिक स्वास्थ्यावर चांगला परिणाम होतो.

2. **बौद्धिक विकास**ः श्रमाचे माध्यम व्यक्तीला त्याच्या कौशल्यांच्या विकासात मदत करते. श्रमाच्या माध्यमातून व्यक्ती नवीन कौशल्ये शिकतो आणि मूल्य नोंदवतो.

3. **सामाजिक विकास** : श्रम मानव जीवनातील सर्वात महत्त्वाचे अंग आहे. श्रमाने समाजाच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. श्रमाच्या माध्यमातून विविध उत्पादन व्यवसाय सुरू करणे शक्य झाले आहे.श्रमाच्या माध्यमातून लोकांना रोजगार उपलब्ध होतात आणि समाजात समानता प्रस्थापित होते आणि सामाजिक विकास होतो.

4. **आर्थिक विकास** :श्रमाच्या माध्यमातून व्यक्ती आर्थिक विकास करू शकतो. ते आपल्या कौशल्यांनुसार विविध क्षेत्रांमध्ये काम करू शकतात आणि आर्थिक उपलब्धी होते .श्रम मानवाला आर्थिक स्वतंत्रता देण्यासाठी उपयुक्त माध्यम आहे. श्रमाचे काम करून व्यक्तीची आर्थिक प्रगती होते.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

5. **व्यक्तिमत्व विकास** : श्रमाचे काम करणे व्यक्तीमध्ये स्वतंत्रता, संघर्षशीलता व मेहनती असल्याचे जाणून घेण्यासाठी श्रम आवश्यक आहे.

भावी पिढी सक्षम व्हावी असं वाटत असेल तर त्यांच्या बालमनावरती श्रमाचे संस्कार लहान वयापासूनच करायला हवेत. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक आहे.आपल्या राष्ट्राचे उद्याचे नागरिक हे आळशी होऊ नयेत म्हणून मुलांच्या बालमनावरती चांगल्या संस्काराचे रोपण होणे आवश्यक आहे. त्यामध्ये श्रमाचे संस्कार ही काळाची गरज आहे तात्पर्य विदयार्थ्यांमध्ये बालवयातच श्रमाची सवय निर्माण करणे आवश्यक आहे.

**शीर्षक**

**माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा अभ्यास**

**समस्या विधान**

प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख हेतू माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विदयार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा अभ्यास करणे हा आहे.समस्या विधान प्रश्नाच्या स्वरूपात मांडले आहे. माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा हे मूल्य आहे का ?

**संशोधन समस्या विधानातील पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या**

**1) माध्यमिक स्तर**

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरांमधील इयत्ता 9 वी ते 10 वी च्या इयत्तांपैकी इयत्ता 9 वी चा वर्ग म्हणजे माध्यमिक स्तर.

**2) मूल्य**

1. ज्यांना जीवनात आपण विशेष मोलाचे मानतो, यामुळे आपले जीवन अधिकाधिक अर्थपूर्ण व व स्वास्थयुक्त होईल अशी आपली श्रद्धा असते अशा बाबींना मूल्य म्हणतात.
2. महाराष्ट्र शासनाने 1997–98 च्या अध्यादेशात नमूद केलेली एकूण दहा मूल्यांपैकी श्रमप्रतिष्ठा मूल्य होय.

**3) श्रमप्रतिष्ठा**

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विदयार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक श्रम आणि श्रमाविषयी आदर याविषयींचा अभ्यास.

**4) अभ्यास**

एखाद्या ज्ञानशाखेचा केलेला पाठपुरावा म्हणजे अभ्यास होय.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा शोध घेणे.
2. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मधील श्रमप्रतिष्ठा या मूल्याची तुलना करणे.

**परिकल्पना**

1.माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विदयार्थ्यांनामध्ये उच्च दर्जाची श्रमप्रतिष्ठा आढळत नाही.

2.माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या श्रमप्रतिष्ठा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**व्याप्ती व मर्यादा**

**व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनात सातारा शहरातील माध्यमिक स्तरावरील वर्ग 9 वी च्या विदयार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**मर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन केवळ सातारा शहरातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विदयार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

2. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विदयार्थ्यांच्या केवळ श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा अभ्यास केला आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान स्थितीशी निगडित आहे म्हणून संशोधनासाठी सर्वेक्षण व निरीक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श**

सातारा शहरातील माध्यमिक स्तरावरील वर्ग 9 वी च्या विदयार्थ्यांच्या समावेश जनसंख्येमध्ये करण्यात आला.न्यादर्श सातारा शहरातील माध्यमिक स्तरावरील वर्ग नववीच्या 60 विदयार्थ्यांची ( 30 विद्यार्थी आणि 30 विद्यार्थीनी) निवड यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचे मापन करण्यासाठी संशोधक निर्मित संपादन चाचणीचा उपयोग करण्यात आला. श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की श्रमाविषयी आणि श्रमिकांविषयी  आदर यांचे मापन करणे अवघड आहे त्याचप्रमाणे हे घटक इतर घटकामधूनही परावर्तित होतात त्यामुळे श्रमप्रतिष्ठा या मूल्याच्या मापनाचा विचार करताना शारीरिक श्रम, बौद्धिक श्रम आणि श्रमाविषयी आदर  या तीन घटकांवर संपादन चाचणी तयार केली. प्रत्येक घटकावर तीन– तीन आणि चार प्रश्न असे एकूण 10 प्रश्नांचा समावेश करण्यात आला .

**कार्यपद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी सातारा शहरातील माध्यमिक स्तरावरील वर्ग 9 वी च्या विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा  या मूल्यावर आधारित संपादन चाचणी देऊन योग्य त्या सूचना देण्यात आल्या व ती त्यांच्याकडून  सोडवून घेण्यात आली.

**संख्याशास्त्रीय परिमाणे**

प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी व परिकल्पनेचे परीक्षण करण्यासाठी केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे,विचलनशीलतेची परिमाणे, व ज परीक्षणाचा वापर करण्यात आला.

**उद्दिष्ट क्रमांक–1**

माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा शोध घेणे.

**परिकल्पना**

माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विदयार्थ्यांमध्ये उच्च दर्जाची क्षमप्रतिष्ठा आढळत नाही.वरील परिकल्पनेचे परीक्षण करण्यासाठी माध्यमिक स्तरावरील 60 विदयार्थ्यांकडून श्रमप्रतिष्ठा या

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मूल्यावर आधारित 10 गुणांची संपादन चाचणी सोडवून घेतली व गुणदान केले. त्यातील जास्तीत जास्त गुण व कमीत कमी गुण घेऊन गुण मर्यादा निश्चित करून विदयार्थ्यांचे निम्न श्रमप्रतिष्ठा गट, साधारण श्रमप्रतिष्ठा गट व उच्च श्रमप्रतिष्ठा गट असे तीन वर्गात वर्गीकरण केलेले आहे. ते पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक– 1 विदयार्थ्यांची श्रमप्रतिष्ठा या मूल्याची गुणमर्यादा**

| अ.क्र | गुणमर्यादा | श्रमप्रतिष्ठा पातळी |
|---|---|---|
| 1 | 01–04 | निम्न |
| 2 | 05– 06 | साधारण |
| 3 | 07–09 | उच्च |

गुणमर्यादा व श्रमप्रतिष्ठा पातळीनुसार विदयार्थ्यांची संख्या व टक्केवारी पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक –2 विदयार्थ्यांची श्रमप्रतिष्ठा**

| अ.क्र | श्रमप्रतिष्ठा पातळी | विद्यार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | निम्न 16 | 16 | 26.67 |
| 2 | साधारण | 33 | 55 |
| 3 | उच्च | 11 | 18.33 |

निम्न प्रमाणात श्रमप्रतिष्ठा असलेल्या विदयार्थ्यांचे शेकडा प्रमाण 26.67 % असून साधारण प्रमाणात श्रमप्रतिष्ठा असलेल्या विदयार्थ्यांचे शेकडा प्रमाण 55 % आहे तर उच्च प्रमाणात श्रमप्रतिष्ठा असलेल्या विदयार्थ्यांचे शेकडा प्रमाण 18.33% इतके आहे. याचा अर्थ असा की उच्च प्रमाणात श्रमप्रतिष्ठा असलेल्या विदयार्थ्यांचे प्रमाण अल्प आहे तर साधारण प्रमाणात श्रमप्रतिष्ठा असलेले विद्यार्थी व निम्न प्रमाणात श्रमप्रतिष्ठा असलेले विद्यार्थी यांचे मिळून शेकडा प्रमाण (55.26. 67)=81.67% इतके आहे. यावरून असे म्हणता येईल की जवळजवळ 82 % विदयार्थ्यांमध्ये साधारण दर्जाची श्रमप्रतिष्ठा आढळते. त्यामुळे वरील परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल.

**तक्ता क्रमांक– 3**

| अ. क्र | चल | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | t मूल्य | 0.05 सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | विद्यार्थी (श्रमप्रतिष्ठा) | **30** | 5.5 | 1.22 | **58** | 4.52 | सार्थ आहे |
| **2** | विद्यार्थिनी(श्रमप्रतिष्ठा) | **30** | 4.76 | 1.19 | | | |

मध्यमानातील फरक = 0.73 विचलनातील फरक =0.30

स्वाधीनता मात्रा (df)=58 (0.05 स्तरावर) सारणी t' मूल्य 4.52 आहे.

तक्ता क्र..3 च्या अध्ययनावरून प्रस्तुत परिकल्पनेकरिता प्राप्त t मूल्य 4.52 आहे. प्राप्त t मूल्य हे टेबल t मूल्यापेक्षा जास्त आहे. म्हणून माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी आणि विद्यार्थिनीच्या श्रमप्रतिष्ठा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आहे म्हणून परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वरील तक्ता क्र. 3 वरून असे दिसून येते की, विद्यार्थिनींचा श्रमप्रतिष्ठा मध्यमान गुणांक हा विद्यार्थ्यांच्या श्रमप्रतिष्ठा मध्यमान गुणांकापेक्षा जास्त आहे. यावरून असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनीमध्ये श्रमप्रतिष्ठा जास्त आहे.

**निष्कर्ष**

1. माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांमध्ये साधारण दर्जाची श्रमप्रतिष्ठा आढळून आली ( तक्ता क्रमांक 2 वरून)
2. माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींमध्ये श्रमप्रतिष्ठा जास्त प्रमाणात आढळून आली.

**संदर्भ ग्रंथ सूची**

*दांडेकर, वा.ना. (2007) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन. पुणे.*

*मुळे रा.श, उमाठे वि.तु. (1998) शैक्षणिक संशोधनाची मूलतव्ये महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ. नागपूर.*

*भिंताडे वि.रा. (2011) शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्य नूतन प्रकाशन पुणे,*

*वीरकर, प्रभाकर व वीरकर,प्रतिभा. (2007)मूल्य शिक्षण संकल्पना व कार्यवाही, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.*

*मुळावकर संतोष व मुळावकर कल्पना. (2005).मूल्यशिक्षणः सुसंवाद, श्री विद्या प्रकाशन,पुणे.*

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*